CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १२ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २८३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## राहुल गांधी, उद्धव ठाकरे, राऊतांसह युट्यूबर ध्रुव राठीविरोधात हायकोर्टात याचिका

✔ **मुंबई** : मुंबई : निवडणूक निकालानंतर ईव्हीएम मशिनचा वाद काही नवा नाही. ईव्हीएम मशिनमध्ये घोळ असल्याचा आरोप सातत्याने पराभूत उमेदवारांच्या पक्षातील काही समर्थकांकडून केला जातो. विशेष म्हणजे अनेकदा राजकीय पक्षांच्या प्रमुखांकडूनही ईव्हीएम मशिन्सऐवजी बॅलोट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणीही केली जाते.

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर मुंबईतील शिवसेना महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या विजयानंतरही असाच ईव्हीएमवर संशय घेऊन वाद निर्माण झाला होता. त्यामुळे, ईव्हीएमबाबत खोट्या, एकतर्फी, आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध केल्याचा आरोप ठेवत काँग्रेस नेते राहुल गांधी, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युट्यूबर ध्रुव राठी यांविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. काँग्रेस नेते आणि संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी शिवसेना नेते उद्धव ठाकरे,संजय राऊत यांच्यासह ध्रुव राठीविरोधात हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. या सर्वांनी माध्यमांत ईव्हीएम मशिन्सबाबत अनाठाई प्रतिक्रिया दिल्याबद्दल एसआयटीमार्फत चौकशीची करण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्याकाळात मोबाईल ओटीपीद्वारे इव्हीएम मशिन हॅक केल्याच्या खोट्या बातम्या प्रसिद्ध केल्याप्रकरणी हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे.



## ● विधान परिषदेच्या सभापतीपदावरून

# महायुतीत वादाचा भडका



- अजित पवार राष्ट्रवादीने शड्डू ठोकल्यानं संघर्ष
- अजित पवार राष्ट्रवादीकडून भाजपला उघडे पाडण्याचा प्रयत्न
- विधान परिषद सभापतीपद देण्याचं आश्वासन भाजपनं दिलं होतं असा नवा स्फोट

## सभापतीपदासाठी शिंदे शिवसेना, भाजप अन् अजित पवार राष्ट्रवादीत रस्सीखेच

✔ मुंबई/खास प्रतिनिधी

**राज्यात राजकीय भूकंप घडवून आणत महायुतीचं सरकार बनविलेल्या आणि एकमेकांच्या हातात हात घेऊन ट्रिपल इंजिनचं सरकार चालविणाऱ्या महायुतीमध्ये विधान परिषदेचा सभापती निवडण्यावरुन संबंध ताणले गेले असून महायुतीत जुंपल्याचे समोर आलं आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात अजित पवार राष्ट्रवादी गटानं भाजपला उघडे पाडण्याचा प्रयत्न चालविला आहे. राज्यात मित्र पक्षाचं सरकार स्थापन करत असताना विधान परिषदेचं सभापतीपद देऊ, असं भाजपनं अजित पवार राष्ट्रवादी गटाला आश्वस्त केलं होतं असा नवा स्फोट या गटाकडून केला गेला आहे. विधान परिषद सभापती निवडण्यावरुन महायुतीमधील मित्र पक्ष राष्ट्रवादी, शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांच्यामध्ये रस्सीखेच सुरु आहे.**



दरम्यान, राज्यात सरकार स्थापन करताना विधान परिषदेचं सभापतीपद अजित पवार गटाला देण्याचा जो मुद्दा या गटानं निवडीच्या पार्श्वभूमीवर केला आहे, त्यावर भाजपन मौन पाळण्याची भूमिका घेतली आहे. तथापि, खरोखरच आश्वासन दिलं असेल तर अजित पवार गट भाजपनं तत्कालीन वेळी दिलेला शब्द पाळण्यासाठी किती आग्रही राहणार हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जात आहे. अजित पवार गटानं विधान परिषद सभापतीपदावर दावा सांगितल्यानं राजकारण फिरलं असून यापदासाठी हालचाली वाढल्या आहेत. गेली दोन वर्षे रिक्त असलेल्या विधान परिषद सभापतीपदाची निवडणूक घेण्याची योजना असली तरी भाजप, शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादीतील अजित पवार गटाने या पदावर दावा केल्याने सत्ताधारी महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. रामराजे नाईक निंबाळकर यांची मुदत ऑगस्ट २०२२ मध्ये संपल्यापासून विधान परिषदेचे सभापतीपद रिक्त आहे. विधानसभा निवडणुकीर्पूर्वी ही निवडणूक घेण्याची योजना आहे. पण हे पद कोणत्या पक्षाकडे द्यायचे यावर अद्याप सहमती होऊ शकलेली नाही. सभापतीपदावर भाजपचा डोळा आहे. माजी मंत्री राम शिंदे यांच्याकडे सभापतीपद सोपवून धनगर समाजात चांगला संदेश देण्याची भाजपची योजना आहे. शिवसेना ठाकरे गट सोडून शिंदे गटात सहभागी झालेल्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे सभापतीपद सोपविण्यात यावे, अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे. शिंदे गटात प्रवेश करताना गोऱ्हे यांना सभापतीपदाचे आश्वासन देण्यात आले होते. महायुती सरकारमध्ये सहभागी होताना सभापतीपद देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, असा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचा दावा आहे. परिणामी तिन्ही पक्षांमध्ये सभापतीपदावरून एकमत होऊ शकलेले नाही. सभापतीपदाच्या निवडणुकीची तारीख ही राज्यपालांकडून निश्चित केली जाते. त्याआधी मुख्यमंत्री कार्यालयाकडून निवडणुकीची तारीख निश्चित करण्याची विनंती करणारे पत्र राज्यपालांना पाठवावे लागते. तसेच सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या तारखेच्या आधल्या दिवशी मध्यान्हापूर्वी उमेदवाराच्या नावाची शिफारस करावी लागते. अधिवेशन शुक्रवारी संपत असल्याने ही सारी प्रक्रिया उद्याच पूर्ण करावी लागेल.

### काही ठळक नोंदी...

- बहुचर्चित विधान परिषदेच्या ११ जागांसाठी आज मतदान
- विधान परिषदेसाठी शिंदे शिवसेनेकडं ४८ मतांचा दावा
- आमदार फुटू नये यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीने घेतली पुरेपूर दक्षता
- देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या नेतेमंडळींचं निवडणुकीवर खास लक्ष
- प्रत्यक्ष निवडणुकीत काही वेगळं घडण्याची देखील शक्यता असल्याची चर्चा

### सभापतीपदासाठी 'हे' चेहरे चर्चेत

- भाजप **राम शिंदे**
- शिंदे शिवसेना गट : **निलम गोऱ्हे**





### फडणवीसांची जोरकस फिल्डिंग

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी पाच उमेदवारी घेऊन भाजप उतरली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या निवडणुकीसाठी फिल्डिंग लावून आहेत. या जागा जिंकण्यासाठी पुरसं बहुमत भाजपकडं असल्याचा त्यांनी दावा केला आहे. मित्रपक्षांच्या जागादेखील निवडून यायला हव्यात असा त्यांचा आग्रह आहे. मतदान नेमकं कसं करायचं याचं प्रात्याक्षिक आमदारांना दाखविण्यात आलं आहे. महायुतीचे आमदार फुटू नयेत, यासंबंधी फडणवीस हे दक्षता घेत आहेत.

## मोहोळचे तत्कालीन तहसीलदार बेडसेंना घरचा रस्ता

### ● नियमांच्या उल्लंघनासह अपमानास्पद वागणूक देणे भोवले

✔ **पुणे** : मोहोळचे तत्कालीन वादग्रस्त तहसीलदार तसेच पुण्यातील खेडचे सध्याचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्यावर कोविड नियमांचे उल्लंघन करणे, सर्वसामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक देणे, वकिलांना अपमानास्पद वागणूक देणे, तसेच त्यांच्याबद्दल आलेल्या तक्रारी या गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यामुळे शासनाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रशांत बेडसे यांच्या विरोधात चौकशी करण्याच्या दृष्टीने चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



याबाबत शासनाने असा आदेश दिला आहे की, निलंबन कालावधीमध्ये त्यांनी संमतीशिवाय कुठेही जाऊ नये. या निलंबन कालावधी त्यांनी खासगी नोकरी, धंदा व्यापार करू नये. जर त्यांनी असे केले तर ते त्या दोषारोपात पात्र ठरतील. त्या अनुषंगाने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल. तसेच या अटींचे उल्लंघन केल्यास तहसीलदार प्रशांत बेडसे हे निलंबन निर्वाह भत्ता देखील गमविण्यास पात्र ठरतील. त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरु होती. या चौकशीच्या अवघ्या १० दिवसातच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच या कालावधीत पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्यालय त्यांना सोडता येणार नाही आहे, असे आदेशात नमुद केले आहे.

## लाकडी ठोकळ्याच्या मारहाणीत सासरा गंभीर; सुनेविरुद्ध गुन्हा

✔ **मंगळवेढा** : मोटकिरकोळ कारणावरून झालेल्या भांडणात सुनेने वृद्ध सासऱ्याला लाकडी ठोकळ्याने मारून गंभीर जखमी केले. ही घटना हुन्नूर (ता.मंगळवेढा ) येथे घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी जखमी वृद्धाच्या सुने विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नाना यमुनाप्पा माने (वय ८४ रा.हुन्नूर) असे जखमींचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी त्यांची सून मलकाबाई बाळासाहेब माने (रा. हुन्नूर) हिच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. अशी नोंद पोलिसात झाली हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत.

## पंढरपूर येथे मोटार अडवून कोयत्याने हल्ला

### ● तिघांविरुद्ध गुन्हा; एकास अटक

✔ **पंढरपूर** : मोटार अडवून कोयता आणि हाताने केलेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले. ही घटना पंढरपूर शहरातील अर्बन बँकेजवळ बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

या संदर्भात सोमनाथ दिलीप प्रक्षाळे (वय ३२ रा .चळे ता.पंढरपूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी स्वप्निल संताजी ठाकरे, अक्षय सुनील पवार आणि रोहित खरात ( तिघे रा.पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सोमनाथ प्रक्षाळे हे बुधवारी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास आपल्या पुतण्या आणि मित्रासोबत पंढरपूर येथील अर्बन बँकेजवळ आले होते त्यावेळी त्यांच्या मोटारीला ओव्हरटेक करीत एमएच१३-०५-एएक्स- ५०० ५ या क्रमांकाच्या मोटारीतून वरील तिघांनी गाडी अडवली. आणि खाली उतरून विनाकारण त्यांना शिवीगाळ केली. शिवीगाळ का करता ? आहे असे विचारले असता त्यापैकी एकाने मोटारीतून कोयता काढून स्वप्निल प्रक्षाळे यांच्यावर हल्ला केला. तर इतर दोघांनी त्यांच्यासोबत असलेल्या दोघांनी मारहाण केली .अशी नोंद पोलिसात झाली. त्यापैकी स्वप्निल संताजी ठाकरे (वय ३०, रा.नागालँड चौक, पंढरपूर) याला पोलिसांनी अटक केली. हवालदार यलपले पुढील तपास करीत आहेत.

### ● गुरसाळे येथे चोरी

## १ लाख ७० हजारांचे दागिने केले लंपास

✔ सुराज्य/पंढरपूर

तालुक्यातील गुरसाळे येथे राहणाऱ्या एका महिलेच्या उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने लॉकरमधील १ लाख ७० हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही चोरी ५ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडली. वैशाली कवडे (रा. गुरसाळे ता.पंढरपूर) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास हवालदार घंटे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सांगा तुम्ही, गाडी कशी चालवायची?

कल्याण

260-88-116

## अगा नवलचं..! आखाती देशात करमाळ्याचा केळीचा 'गोडवाच गोडवा'

# सुटा-बुटातल्या नवतरुण बळीराजाचं दुष्काळी सोलापूर जिल्ह्यात 'केळी'चं हब

- वर्षाला साधाण ८० हजार टन केळीची निर्यात
- बळीराजाच्या आयुष्यात समृद्धीची उगवलेय पहाट
- परकीय चलनातून सोलापूर जिल्ह्याची अर्थक्रांतीकडे वाटचाल

✔ विशाल परदेशी/करमाळा

**पिढ्यान पिढ्याचा दुष्काळी कलंक लागलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यासाठी उजनी धरण हे जणू वरदायिनी ठरलं. याच धरणाचा बॅक वॉटर करमाळा तालुक्याचा भाग आता केळी उत्पादनाचा हब होतोय. महाराष्ट्रातील केळी उत्पादन अन् निर्यातीचं हे केंद्र बनलंय. इथली केळी आखाती देशांमध्ये ग्राहकप्रिय होत असून साधारण वर्षाला ८० हजार टन केळीची निर्यात या देशांमध्ये होत आहे. केळीच्या उत्पादनातून वर्षाला लाखोंची कमाई या भागातील शेतकऱ्यांना होतेय. यातून बळीराजाच्या आयुष्यात खऱ्या अर्थानं समृद्धीची पहाट उगवतेय. केळीच्या निर्यातीमधून कोट्यवधीचं परकीय चलन सोलापूर जिल्ह्यात येत आहे, त्यातून आजवर दुष्काळानं गलितगात्र झालेल्या सोलापूर जिल्ह्याची वाटचाल अर्थक्रांतीकडे होत आहे. दरम्यान सुटा-बुटातल्या नवतरुणं शेतकऱ्याने उजनीच्या बॅकवॉटर भागात केळीचं हब निर्माण केलयं.**

### संशोधन केंद्रासंबंधी आशादायी चित्र

मुख्य करमाळा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात अन्य तालुक्यांमध्ये उत्पादीत होत असलेल्या केळी उत्पादनांच्या अनुषंगाने, करमाळा तालुक्यातील कंदर, शेलगाव भागात केळी संशोधन केंद्र उभारण्याच्या दृष्टीने हालचाली होत आहे, ही केळी उत्पादकांसाठी सुखावणारी गोष्ट आहे. केळी संशोधन केंद्र झाल्यास केळी उत्पादन, निर्यात यासंबंधीच्या अनेक फायद्याच्या गोष्टी केळी उत्पादक शेतकऱ्यांसह जिल्ह्यासाठी होणार आहेत.



" करमाळा तालुक्यातील नैसर्गिक वातावरण अनुकूलतेमुळे निर्यातक्षम दर्जेदार केळीचे उत्पादन होते .उसाच्या तुलनेत केळीपासून शेतकऱ्यांना चांगला फायदा होत असल्याने अनेक शेतकरी केळी पिकाकडे वळले आहेत परंतु केळीचे चांगले दिवस टिकून राहण्यासाठी करमाळा तालुक्यात शेलगाव येथे केळी संशोधन केंद्र होण्याची गरज आहे.



**- वैभव पोळ,** केळी उत्पादक शेतकरी, शेटफळ, ता. करमाळा "

" तालुक्यात कोल्डस्टोरेज उभारणी झाल्याने शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यास मदत होत आहे. अनेक बेरोजगारांना या व्यवसायातून रोजगार उपलब्ध झाला आहे. देशातील वेगवेगळ्या निर्यात कंपन्या तालुक्यात केळी खरेदीसाठी येत असल्याने स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांना चांगला दर मिळत आहे. म्हणून पुढील काळात शेतकऱ्यांनी फ्रुट केअर मॅनेजमेंट करून केळीचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



**- रंगनाथ शिंदे,** केळी निर्यातदार व कोल्डस्टोरेज चालक, कंदर ता. करमाळा "

मागील काही वर्षाखाली साखर कारखान्यांची संख्या कमी असल्याने उजनी लाभक्षेत्रातील अतिरिक्त ऊसाचा प्रश्न प्रकर्षाने निर्माण होत असे. या प्रश्नाला पर्याय शोधण्याच्या दृष्टीने तालुक्यातील कंदर परिसरातील काही प्रगतिशील शेतकऱ्यांनी केळी लागवडीचा प्रयत्न केला. यानिमित्ताने तालुक्यातील वातावरण केळी पिकासाठी पोषक असल्याची प्रचिती आल्यानंतर सध्या तालुक्यात केळी क्षेत्रात वाढ होत आहे. अल्पावधीतच तालुक्यात निर्यातक्षम केळीचे उत्पादन होऊ लागले आणि करमाळा तालुक्याच्या रुपाने अलिकडील काळात केळी निर्यातीत सोलापूरची सरशी ठरत आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून केळीला चांगला दर मिळत आहे. तालुक्यातील कंदर, वांगी, शेटफळ, उमरड, वाशिंबे आदी उजनी बॅकवॉटर परिसरासह वरकटणे, सरपडोह, सौंदे या गावाच्या परिसरातील शेतकरीही केळी पिकाकडे वळालेले दिसत आहेत. ऊसाच्या तुलनेत उत्पादन खर्च जास्त होत असला तरी करमाळा तालुक्यात वर्षभर केळींची लागवड केली जाते. तालुक्यात दरवर्षी अडीच लाख टन केळीचे उत्पादन होत असून, यापैकी जवळपास ८० हजार टन केळी इराण, ओमान, इराक, सौदी अरेबिया, दुबई, अफगाणिस्तान, नेपाळ या देशांत निर्यात केली जात आहे. निर्यातक्षम केळींसाठी तालुक्यात कंदर, जेऊर, वाशिंबे, वरकटणे, शेटफळ शीतगृहे कार्यरत असून या भागात रस्तेही चांगले झाल्याने निर्यातीला चालना मिळत आहे.

अलिकडच्या काळात नियमितपणे दर्जेदार केळीचा पुरवठा होत असल्याने व्यापारी मोठ्या प्रमाणावर तालुक्याकडे आकर्षित होत आहेत. यामुळे करमाळा तालुका केळी हब बनु लागला आहे. त्यातच अभ्यासू शेतकऱ्यांनी केळीच्या विविध प्रजातींची लागवड सुरु केली आहे.

(पान ८ वर )

CMYK